**पी. डब्लयु. डी. व्ही. ए. क्र. ४१/२०२५**
**सलोनी परदेशी वि. रोहीत परदेशी व इतर**

**अर्जदाराने दिनांक २३/०७/२०२५ रोजी दाखल केलेल्या रहिवासाबाबतच्या अर्जावरील आदेश (Application ID No. AMH20210051704D202500963)**

सदरचा अर्ज अर्जदाराने तिला तिचे राहते घरातुन बाहेर काढु नये. तसेच तिचे राहते घर जाबदेणाराने इतर त्रयस्थ व्यक्तीना विकु नये यासाठी एकतर्फा आदेश मिळणेकरीता दाखल केलेला आहे. अर्जदाराच्या मते तिने जाबदेणाराविरुध्द महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण या कायदया अंतर्गत अर्ज दाखल केला असून जाबदेणारविरुध्द अर्जात नमुद केल्याप्रमाणे विविध रिलीफ मागितलेले आहेत. त्याचप्रमाणे सदरचा अर्ज अर्जदाराने कलम २३ (२) अंतर्गत दाखल केलेला आहे. अर्जदाराच्या मते ती सध्या फलॅट क्र.६०६, गोल्डक्लीफ हौसिंग सोसायटी, आळंदी रोड, दिघी, पुणे येथे राहत असून सदरचा फलॅट जाबदेणार क्र.१ व ३ यांच्या मालकीचा आहे. जाबदेणार क्र.१ अर्जदाराचे पती असून जाबदेणार क्र.३ सासु आहे. असे असताना कोणतेही कारण नसताना जाबदेणार क्र.१ अर्जदाराला सोडुन गेलेले आहेत. जाबदेणार क्र.१ ने अर्जदार राहत असलेला फलॅट त्रयस्थ इसमास विकणार अशी धमकी तिला दिलेली आहे. सदरचा फलॅट इतर त्रयस्थ इसमास विकल्यास अर्जदाराला राहण्याकरीता दुसरे कोणतेही ठिकाण नसल्याने तिने ती राहत असलेला फलॅट इतर त्रयस्थ व्यक्तीना विकु नये. तसेच, तिला त्या फलॅटबाहेर निष्कासित करु नये याकरीता प्रार्थना केलेली आहे.

२. सदर प्रकरणात जाबदेणारांना नोटीस काढण्यात आल्या होत्या. जाबदेणारांनी आज वकीलपत्र, पत्ता पुरशिस आणि मुदतीचा अर्ज ऑनलाईन अपलोड केलेला आहे.

३. जाबदेणारांचा दुपारी ४.०० वाजे पावेतो वारंवार पुकारा केला असता गैरहजर.

४. अर्जदारांतर्फे विदवान वकील श्री. लंजिले यांना ऐकले. तसेच अभिलेखाचे काळजीपुर्वक अवलोकन केले. श्री. लंजिले यांनी विनम्रपणे न्यायालयासमोर कथन केले की, अर्जदार राहत असलेला फलॅट हा जाबदेणार क्र.१ व ३ यांचे मालकीचा आहे. तसेच, त्यांनी माझे लक्ष

दिनांक ०९/०८/२०२५ रोजी दाखल केलेल्या एन.सी. फिर्यादिकडे वेधले असता प्रामुख्याने असे निदर्शनास येते की, दि.०९/०८/२०२५ रोजी काही त्रयस्थ व्यक्तीनी अर्जदारास तिच्या घरातुन बाहेर निघुन जाण्यास सांगितले. तसेच शिवीगाळ करुन दमदाटी केली. सदर विशिष्ट बाब लक्षात घेता अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जावर काही आदेश पारित करणे अगत्याचे झालेले आहे.

५. अर्जदार सध्या फलॅट क्र.६०६, गोल्डक्लीफ सोसायटी, आळंदी रोड, दिघी, पुणे येथे राहत आहे. सदर प्रकरणात जाबदेणार जरी पुकारा केला असता गैरहजर राहिले तरी देखील त्यांनी मुदतीचा अर्ज व वकीलपत्र ऑनलाईन अपलोड केलेले आहे. तेव्हा सदर बाब लक्षात घेता अर्जावर जाबदेणारांचे म्हणणे ऐकुन घेणे आवश्यक आहे. परंतु, अर्जदाराने दिनांक ०९/०८/२०२५ रोजीची दिघी पोलीस स्टेशन येथे दाखल केलेली एन.सी. फिर्याद लक्षात घेता आज दिनांक २५/०८/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता अर्जदार राहत असलेल्या फलॅटबाबतची सदयस्थिती जाबदेणार त्यांचा खुलासा दाखल करेपावेतो अबाधित ठेवणे आवश्यक आहे. सबब, मी खालिल आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदार व जाबदेणार यांनी आज दुपारी ४.०० वाजेपावेतो अर्जदार राहत असलेले फलॅट क्र.६०६, गोल्डक्लीफ सोसायटी, आळंदी रोड, दिघी, पुणे याबाबतची असलेली सदय परिस्थिती जाबदेणारांनी खुलासा दाखल करेपावेतो तशीच ठेवावी.
२. जाबदेणारांनी त्यांचा खुलासा दाखल करेपावेतो अर्जदारास फलॅट मधुन निष्कासित करु नये किंवा तो फलॅट इतर त्रयस्थ व्यक्तीना विकु नये.
३. जाबदेणारांनी पुढील तारखेपर्यंत त्यांचा खुलासा अभिलेखावर दाखल करावा.
४. जाबदेणारांनी खुलासा दाखल केल्यानंतर सदर अर्ज व अंतरिम अर्ज दोन्हीही एकत्रीतरित्या निश्चित केले जातील.

LALIT VASANTRAO SHRIKHANDE

Digitally signed by LALIT VASANTRAO SHRIKHANDE

दिनांक – २५/०८/२०२५

(एल. व्ही. श्रीखंडे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
फौजदारी न्यायालय क्र. ३, खडकी, पुणे.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. S. Gupte (Grade- III) |
| Name of the Court | : | Shri. L. V. Shrikhande,<br>J.M.F.C. Court No. 3, Khadki, Pune |
| Date | : | 25.08.2025 |
| Order signed by the Presiding officer on | : | 25.08.2025 |
| Order uploaded on | : | 25.08.2025 |